पुणे जिल्हा परिषद (शिक्षण विभाग)
जा.क्र.शिक्षण/माध्य./एम-४/ ८०
पुणे-१ दि. १४/१२/८०

प्रति,

श्री. पारमार्थिक शिक्षा संघ
मुंबई - लालबहादूर शास्त्री मार्ग आयेवाडी
मुनसीबाई चाळ विक्रोळी (पश्चिम) मुंबई-८१

विषय:- भैरवनाथ विद्यालय पारगांव शिंगवे ता. आंबेगाव या शाळेस मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- म.शा.श.प्र.मं.एसएसएन/१९८०/६१४६७(५२१६)एन माशि-१ दि.२६/११/८०

महाशय,

उपरोक्त संदर्भान्वित पत्रानुसार आपल्या संस्थेतर्फे शिंगवे ता. आंबेगाव येथे नवीन माध्यमिक शाळा जून १९८० पासून मराठी माध्यमातून सुरु करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. सुरुवातीस इ. ८ वी व, ९वी च्या ऐकक वर्गांना मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील नवीन माध्यमिक शाळेस सन ८०-८१ व ८१-८२ या दोन वर्षात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा त्या शाळेतील विद्यार्थ्यांना इ. बी. सी. सवलत मिळण्यास पात्र ठरणार नाहीत. या शर्तीवर परवानगी देण्यात आलेली आहे. आपली शाळा ८२-८३ (१ एप्रिल ८२) या वर्षापासून सर्व विहीत अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर अनुदान मिळण्यास पात्र ठरेल.

तसेंच खालील विहित अटींची पूर्तता त्वरीत करण्यात यावी.

१) प्रत्येक मंजूर झालेल्या वर्गामागे रु. ५०००/- अधिकृत बँकेमध्ये ठेव ठेवणे आवश्यक आहे.

२) प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांचीच फक्त नेमणूक करण्यात यावी.

३) शाळेच्या मान्यतेकरीता मा. शा. सं. क्र. १ मधील बाबींची पूर्तता करणे.

४) पुरेशा प्रमाणात फर्निचर, वाचनालयासाठी लागणारी पुस्तके, शास्त्रीय उपकरणे इ. पुरेशा प्रमाणात उपलब्ध करणे.

उपरोक्त बाबींचा पूर्तता अहवाल १५ दिवसांचे आंत या कार्यालयास पाठवावा.

Approved

आपला विश्वासू

शिक्षणाधिकारी
जिल्हा परिषद पुणे करिता

प्रतिलिपी - मा. शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१
२) अधिक्षक वेतन पथक पुणे-१

मुख्याध्यापक

...नगर

वर्ग/मान्यता ८५/८६

अत्यंत महत्वाचे

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
[शिक्षण विभाग]
जा.क्र.शिक्षण-माध्य-ह-२/व्या.तु.१९८
पुणे-१ दिनांक -१३-८-१९८५

प्रति, मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
श्रीनाथ विद्या मंदिर पारगांव पुणे जिल्हा ता. आंबेगाव.

विषय :- १९८५-८६ मध्ये मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांतील वर्गवार तुकड्यांना मंजुरीबाबत.

मान. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील जाक्रमांक दिनांक अन्वये या कार्यालयाचे जा.क्र.शिक्षण-माध्य-ह-२/शि.नि. दिनांक २२.१.८५ अन्वये सन ८४-८५ मधील डिसेंबर १९८४ ची तुकडी त्यांच्या पटसंख्या व इतर सरासरीबाबतची माहिती अ व ब प्रपत्रात मागविण्यात आलेली होती. त्याची छाननी करण्यात आली. तसेच ८५-८६ करिता पुणे जिल्ह्यातील मान. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेल्या तुकड्यांची संख्या व आर्थिक तरतूद विचारात घेऊन आपले मंजुरीबाबतचे/मान्यता देण्यात येत आहे. शाळेस खाली नमूद केलेप्रमाणे ८५-८६ सालाकरिता तुकडी मंजूर करण्यात येत आहे.

[१] सन १९८४-८५ मध्ये आपले शाळेस मंजूर असलेल्या तुकड्यांची संख्या व विद्यार्थी संख्या लक्षात घेता सन ८५-८६ करिता इयत्ता ची तुकडी कमी करून इयत्ता ची तुकडी देण्यात येत आहे.

[२] इयत्ता ५वी ते ७वी या वर्गाच्या १९८५-८६ मध्ये मंजूर केलेल्या तुकड्यांच्या प्रमाणात विहित संख्येनुसार विद्यार्थी दाखल करू नयेत. सदर विद्यार्थी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नगरपालिका या शाळेत पाठविणे कार्यवाही करण्यात यावी.

[३] सन १९८३-८४, ८४-८५ मध्ये आपले शाळेस नव्याने मान्यता मिळाल्याने सन ८५-८६ करिता नैसर्गिक वाढ म्हणून इ. चे वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

[४] सन १९८४-८५ मध्ये मंजूर झालेल्या तुकड्यांपैकी सन ८५-८६ करिता इ. ची तुकडी कमी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | इयत्ता | | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९८४-८५ | तुकड्या | — | — | — | 1 | 1 | 1 | 3 |
| २ | १९८५-८६ | तुकड्या | — | — | — | 1 | 1 | 1 | 3 |

मंजूर तुकड्यांच्या व्यतिरिक्त ज्यादा तुकड्या कोणत्याही परिस्थितीत चालू ठेऊ नयेत. मंजूर नसलेल्या तुकड्यांचे संबंधात शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगाराम तसेच नामंजूर तुकड्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

शिक्षणाधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता

प्रत :- अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी शाखा, पुणे-१ यांचे माहितीसाठी.

यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे जिल्हा परिषद, पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)

जा.क्र. शिक्षण-माध्य-सेनिमा-९४-९५, पुणे-१.
दिनांक : १ - ८ - १९९४.

प्रति,

मान. मुख्याध्यापक-मुख्याध्यापिका,
श्री. भैरवनाथ विद्यालय शिंगवे
ता. आंबेगाव जि. पुणे

विषय :-- सन १९९४-९५ मध्ये मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतील तुकड्या मान्यता आदेश.

महाशय,

१) सन ९४-९५ मध्ये इयत्ता - ची तुकडी कमी करुन इयत्ता - ची तुकडी - देण्यात येत आहे.

२) सन ९४-९५ मध्ये इयत्ता -- ची — तुकडी कमी करण्यात आली आहे.

३) सन १९९४-९५ मधील इयत्तावार तुकड्यांची संख्या खालीलप्रमाणे मंजूर करण्यांत येत आहे.

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९३-९४ | १ | १ | - | २ | १ | १ | ६ |
| १९९४-९५ | १ | १ | - | २ | १ | १ | ६ |

मंजूर तुकड्या व्यतिरिक्त जादा तुकड्या कोणत्याही परिस्थितीत चालू ठेवण्यात येवू नयेत. मंजूर नसलेल्या तुकड्यांच्या संदर्भात नियुक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची तसेच नामंजूर तुकड्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,
(स्वाक्षरी) १.८.९४
शिक्षणाधिकारी, (माध्य)
जि.प., पुणे-१.

प्रतिलिपी :-

अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे
यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

यशवंतराव चव्हाण भवन
पुणे जिल्हा परिषद, पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)

जा. क्र. शिक्षण । माध्य. । सेनिमा । १९९६–९७

दिनांक १७ । ८ । १९९६

प्रति,
मान. मुख्याध्यापक । मुख्याध्यापिका,

श्री भैरवनाथ विद्यालय, चिंबळे (पोरा १)

ता. आंबेगाव जि. पुणे

विषय : सन १९९६–९७ मध्य मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतील तुकडया मान्यता आदेश

संदर्भ : जा.क्र. १६५/९६-९७ दि. १७/८/९६

महाशय,

१ ) सन ९६–९७ मध्ये इयत्ता      ची तुकडी कमी करुन इयत्ता      ची तुकडी देण्यात येत आहे.

२ ) सन ९६–९७ मध्ये इयत्ता      ची तुकडी कमी करण्यात आली आहे.

३ ) सन ९६–९७ मधील इयत्तावार तुकडयांची संख्या खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५–९६ | १ | १ | १ | २ | १ | १ | ७ |
| १९९६–९७ | १ | १ | १ | २ | १ | १ | ७ |

मंजूर तुकडया व्यतिरिक्त जादा तुकडया कोणत्याही परिस्थितीत चालू ठेवण्यात येवू नयेत. मंजूर नसलेल्या तुकडयांच्या संदर्भात नियुक्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची तसेच नामंजूर तुकडयांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी

आपला विश्वासू,

स्थळ प्रतीवर मा. शि. अ. ( माध्य. ) यांची सही आहे.

(सही) १७/८/९६

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जि. प. पुणे–१ यांचेकरिता

प्रतिलिपी :–
अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे
यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

मुख्याध्यापक